# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.05.2025** **वार- बुधवार**

---

**शंभू**

पुरंदर किल्ल्यावरील माची आणि छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झालेल्या वाड्यांच्या भिंतीची पुनर्बांधणी, संवर्धन आणि जतनाच्या अनुषंगानं लष्कराशी चर्चा करून सकारात्मक प्रयत्न करू, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज दिली. किल्ले पुरंदर इथं छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला शेलार आणि मराठी भाषा आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं, त्यानंतर शेलार बोलत होते. रत्नागिरी जिल्ह्यातील कसबा या गावात राज्य शासनाच्या वतीनं संभाजी महाराजांचं स्मारक उभारण्यात येईल, अशी घोषणा उद्योगमंत्री सामंत यांनी यावेळी केली. आमदार विजय शिवतारे यांनी पुरंदर तालुक्याला प्रचंड ऐतिहासिक वारसा असल्याचं सांगून, पुरंदर किल्ल्याचा विकास आराखडा व्हावा अशी मागणी केली.

**खते-कृषी उपसंचालक**

विद्यमान खरिप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता, बाजारात उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचं आवाहन कृषी विभागाकडून राज्यातल्या सर्व शेतकरी बांधवांना करण्यात येत आहे. डिएपी खतांना शेक-यांकडून जास्त मागणी आहे. या खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणं गरजेचं आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एस एस पी या खताची सर्वाधिक मागणी आहे.  सोबतच संयुक्त खतांच्या वापरामुळं नत्र आणि स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होतं असं पुण्यातील कृषी उप-संचालकांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितलं आहे.

**जलस्रोत**

पुणे  जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीनं पावसाळ्याच्या आधी जिल्ह्यातील तीन हजार 405 जलस्रोतांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये 13 तालुक्यांतील 138 ठिकाणचे नमुने दूषित

आढळले. वेल्हे तालुक्यातील 92 पैकी एकही जलस्त्रोत दूषित निघाला नाही. तर जुन्नर तालुक्यात सर्वाधिक जलस्त्रोत दूषित आढळले.

**पूर**
विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी आज पुण्यात एका बैठकीत मान्सूनपूर्व तयारीचा विभागस्तरीय आढावा घेतला. पूरपरिस्थितीत जीवित आणि वित्त हानी टाळण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**वृक्ष**
पुणे शहरातील विविध रस्त्यांच्या कडेला असलेल्या, झाडांच्या वाढीतील अडचणी दूर करण्याबरोबरच झाडांवर ठोकण्यात आलेले खिळे काढून टाकण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीनं ‘वृक्ष रुग्णवाहिका  हा उपक्रम सुरू केला जाणार आहे. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी ही माहिती दिली.

**ऍप**
सार्वजनिक उद्यानांची उत्तम देखभाल सुनिश्चित करण्याच्या उद्देशानं पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं ‘दक्ष’ या नाविन्यपूर्ण ॲपची निर्मिती केली आहे. याद्वारे अधिकाऱ्यांना रोजच्या उद्यान देखभाल कामांची नियुक्ती, देखरेख आणि पडताळणी करण्यासाठी मदत होत आहे. पर्यवेक्षक प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन कामाची पडताळणी करत आहेत. यामुळं अचूक अहवालांची खात्री तर जुन्या कालबाह्य, कागदोपत्री प्रगती अहवालांवरचं अवलंबित्व कमी होत आहे.

**पिंपरी चिंचवड**
पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत विविध विकासकामांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली. यामध्ये नेहरूनगर, चिखली या ठिकाणी स्मशानभूमीमध्ये हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यासह विविध कामांचा समावेश होता.

**पुस्तक**
उन्हाळ्याच्या सुटीत शालेय मुलांना वाचनाची गोडी लागावी, इतिहास, कला, साहित्य आणि संस्कृतीची माहिती व्हावी आणि लेखन-आकलन कौशल्य वाढावं, या उद्देशानं पुणे बाल पुस्तक जत्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. ही जत्रा 22 ते 25 मे या कालावधीत गणेश कला क्रीडा मंच इथं आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे विश्वस्त आणि पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

**गुणपत्रिका**

इयत्ता बारावीच्या गुणपत्रिका परवा सोळा तारखेला, दुपारी 3 वाजता संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येणार असल्याचं मंडळानं कळवलं आहे.

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये आयोजित सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत सायकलिंग प्रकारात, पुण्यात सराव करणाऱ्या मुंबईच्या आभा सोमणनं 60 किलोमीटर स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. प्रशिक्षक दिपाली बारगुजे यांच्या मार्गदर्शनात ती पुण्यात सराव करत आहे. मुलींच्या सायकलींग प्रकारात महाराष्ट्रानं एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदक जिंकत विजेतेपद ही पटकावलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात काल झालेल्या पावसामुळे आणि ढगाळ हवामानामुळे किमान तापमानात घट झाली आहे. पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 34 तर किमान तापमान 23 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं.उद्याही याच स्वरूपाचं तापमान अपेक्षित असून, दुपारी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**